दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २१० वा रविवार दि.२१ जानेवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS L&T SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


## भाजपमुळे आदिवासी संधींपासून वंचित

माजुली : भाजपला आदिवासींना जंगलात बंदिस्त ठेवून त्यांना शिक्षण व इतर संधींपासून वंचित ठेवायचे असल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज भारत जोडो न्याय यात्रेत केला. या यात्रेच्या आसाममधील आजच्या दुस-या दिवशी त्यांनी मोटारीतूनच सभेला संबोधित केले. सभेला प्रामुख्याने आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. काँग्रेसने आदिवासींचा प्रथम रहिवासी म्हणून संसाधनांवर असलेला हक्क ओळखल्याचा दावाही त्यांनी केला.राहुल गांधी आदिवासींना उद्देशून म्हणाले, की आम्ही तुम्हाला आदिवासी म्हणतो कारण तुम्ही प्रथम रहिवासी आहात. भाजप मात्र तुम्हाला वनवासी म्हणतो, ज्याचा अर्थ जंगलात राहणारा असा होतो. भाजप नेतृत्वाखालील केंद्र सरकारला आदिवासींना जंगलात बंदिस्त ठेवून त्यांच्या मुलांना शाळा-विद्यापीठांत शिक्षण घेण्यापासून, इंग्रजी शिकणे, व्यापार करण्यापर्यंत वंचित ठेवायचे आहे. जे तुमचे आहे, ते तुम्हाला परत मिळाले पाहिजे. जमीन, पाणी आणि जंगले तुमचीच असली पाहिजेत. भाजपचे सरकार देशभरातील आदिवासींच्या जमिनी हडप करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.ते म्हणाले की, तुमच्यासोबत (आदिवासींसोबत) काय घडते आहे हे तुम्हाला माहीत आहे. तुमच्या जमिनी बळकावल्या जात आहेत. तुमचा इतिहास पुसून टाकला जात आहे, ही देशभरातील वस्तुस्थिती आहे. कन्याकुमारी ते काश्मीर दरम्यान २०२२-२३ मध्ये काढलेली भारत जोडो यात्रा यशस्वी झाली. त्यामुळे लोकांनी या दक्षिण ते उत्तर यात्रेनंतर पूर्वेकडून पश्चिमेकडे अशीच यात्रा काढण्याचा आग्रह धरला. म्हणून आम्ही मणिपूरपासून या यात्रेची सुरुवात केली.रस्त्यावर चालण्यासाठी परवानग्या कशाला? आसाम सरकारने रस्त्यांवर चालण्यासाठी अनेक प्रकारच्या परवानग्यांची सक्ती केल्यावरून काँग्रेसचे



आसामचे प्रदेशाध्यक्ष भूपेनकुमार बोराह यांनी राज्य सरकावर टीका केली. जोरहाट येथे यात्रेच्या परवानगी दिलेल्या मार्गाऐवजी दुस-या मार्गावरून यात्रा काढल्याबद्दल यात्रेचे प्रमुख आयोजक के.बी. बायजू यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भात बोराह म्हणाले, आम्ही याबाबत पोलिसांकडे परवानगी मागितली होती. रस्त्यावरून चालण्यासाठी किती परवानग्या घ्यायला हव्यात? आसाममध्ये दोन दिवसांना जेवढ्या अडचणी उद्भवल्या, तेवढ्या इतरत्र कुठेच आल्या नाहीत, अशी टीका जयराम रमेश यांनी केली आहे.

## भारत-म्यानमार सीमेवरील मुक्तसंचार बंद होणार!

दिब्रुगड : म्यानमार सीमा अधिक सुरक्षित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. म्यानमारच्या सीमेवर आता तारेचे कुंपण करण्यात येणार आहे. त्याशिवाय ये-जा करणेही यापुढे परवानगीशिवाय शक्य होणार नाही, असे अमित शाह यांनी सांगितले. म्यानमारच्या ६०० सैनिकांनी आणि नागरिकांनी मिझोराममध्ये घुसखोरी केली, यावर आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह बोलत होते. मागील काही दिवसांपासून भारत आणि म्यानमार यांच्यातील सीमावाद उफाळला होता. सीमारेषावर तणावाचे वातावरण होते. म्यानमार सीमेवरील



मोफत ये-जा यापुढे बंद करण्यात येणार आहे. लवकरच केंद्र सरकार याबाबत अंमलबजावणी करेल, असे अमित शाह यांनी सांगितले.

शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आसामच्या दौ-यावर होते. यावेळी त्यांनी भारत आणि म्यानमार सीमाबाबत मोठी घोषणा केली. ते म्हणाले की, भारत आणि म्यानमार सीमा याआधी सर्वांसाठी खुली होती, पण यापुढे कुंपण घातले जाणार आहे. घुसखोर आणि म्यानमारमधून पळून जाणा-या दहशतवाद्यांना रोखण्यासाठी सरकार दोन्ही देशांमधील मुक्त संचारही बंद करणार आहे.

## आमदार धिरज देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थी शिकणार आता नव्या वर्ग खोलीत 'लातूर ग्रामीण'मधील २३ शाळांसाठी २ कोटी ३८ लाखाचा निधी मंजूर

लातूर : जिल्हा परिषदेच्या शाळांमधील दुरवस्था दूर करण्यासाठी आणि शाळांना नवीन वर्ग खोल्या बांधून देण्याबाबत 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्याकडून होत असलेल्या पाठपुराव्याला यश आले असून यासाठी 'जिल्हा नियोजन'मधून तब्बल २ कोटी ३८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याबद्दल आमदार श्री. धिरज देशमुख यांनी पालकमंत्री श्री. गिरीश महाजन यांचे आभार मानले.जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे शाळांमधील वर्ग खोल्यांची पडझड झाली आहे. तर काही शाळांत स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नाही. त्यामुळे या शाळांमधील चित्र बदलण्यासाठी




आमदार श्री. धिरज देशमुख हे प्रयत्नशील होते. त्यानुसार २३ शाळांसाठी २ कोटी ३८ लाखाचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोडकळीस आलेल्या वर्गखोली ऐवजी लवकरच नव्या वर्ग खोलीत बसून शिकता येणार आहे.यानुसार लातूर जिल्ह्यातील गातेगाव येथे २ नवीन वर्गखोल्या, साखरा येथे ३ नवीन वर्गखोल्या, मळवटी येथे ३ नवीन वर्गखोल्या, काटगाव येथे १ नवीन वर्गखोली, टाकळी ब. येथे १ नवीन वर्गखोली, मुरुड बु. येथे १ नवीन वर्गखोली, गातेगाव येथील शाळेत विद्यार्थिनींसाठी नवीन स्वच्छतागृह रेणापूर तालुक्यातील जवळगा येथे २ नवीन वर्गखोल्या, व्हटी नं. १ येथे ५ नवीन वर्गखोल्या, मोटेगाव येथे ८ नवीन वर्गखोल्या, सांगवी येथे ४ नवीन वर्गखोल्या, तळणी येथे मुले व मुलींसाठी नवीन स्वतंत्र स्वच्छ्तागृह, काळेवाडी येथे मुले व मुलींसाठी नवीन स्वतंत्र स्वच्छ्तागृह, रेणापूर येथे २ नवीन वर्गखोल्या, भंडारवाडी येथे मुलांसाठी नवीन स्वच्छ्तागृह, गरसुळी येथे २ नवीन वर्गखोल्या, ब्रह्मवाडी येथे मुले व मुलींसाठी नवीन स्वतंत्र स्वच्छ्तागृह, इटी येथे १ नवीन किचन शेड, नागापूर येथे १ नवीन किचन शेड, पाथरवाडी येथे १ नवीन किचन शेड तर औसा तालुक्यातील बिरवली येथे १ नवीन वर्ग खोली, कोरंगळा येथे ७ नवीन वर्गखोल्या आणि जायफळ येथे २ नवीन वर्ग खोल्याचे बांधकाम होणार आहे.

## एकाच दिवसात तुरीच्या भावात ७०० रुपयांनी घसरण

लातूर : प्रतिनिधी लातूरच्या उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या दोन-तीन दिवसांपासून तुरीची आवक ब-यापैकी वाढली आहे. शुक्रवारी तुरीची आवक ८ हजार ६१ क्विंटल होती तर किमान भाव १० हजार ७९१ रुपये, कमाल भाव ९ हजार २०१ तर सर्वसाधारण भाव १० हजार रुपये प्रति क्विंटल होता. शनिवारी तुरीची आवक ६ हजार ५०३ क्विंटल झाली त्याला कमाल भाव १० हजार १०० रुपये, किमान भाव ९ हजार ६०१ रुपये तर सर्वसाधारण भाव ९ हजार ७०० रुपये मिळाला. एका दिवसात प्रति क्विंटल तुरीच्या भावात ६९१ रुपयांची घसरण झाली.लातूर जिल्ह्यात ऊस, सोयाबीन खालोखाल तुरीचे उत्पादन घेतले जाते. जिल्ह्यात तुरीचे क्षेत्रही मोठे आहे.

तुरीच्या बाबतीत लातूर जिल्हा देशाला मार्गदर्शक ठरला आहे. लातूरच्या बाजारपेठेत तूर डाळीला निघालेला भाव संपूर्ण देशभरात लागु होतो. संपूर्ण देशाला तूर डाळ पुरविण्याची क्षमता लातूर जिल्ह्यात आहे. परंतू, यंदा मान्सूनचा पाऊस पुर्ण क्षमतेने पडला नाही. नेहमी लातूरच्या मदतीला धावून येणा-या परतीच्या पवसानेही यंदा हुलकावणी दिली. त्यामुळे त्याचा परिणाम तुरीच्या उत्पादनावर झाला. तुरीचे उत्पादन घटले आहे.

## प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यात रामभक्तानी सहभागी व्हावे- आ. कराड

लातूर : - आयोध्येत प्रभू रामचंद्राचे भव्य मंदिर व्हावे हे हजारो वर्षांपासून पाहिलेले स्वप्न देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात २२ जानेवारी रोजी सत्यात उतरत आहे. यानिमित्ताने देशातच नव्हे तर जगभरात मोठा आनंद उत्सव साजरा होत आहे तेव्हा रामभक्तानी, जनतेनी घरोघरी दीपावली साजरी करून या आनंद उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अयोध्या येथे प्रभू श्रीराम मंदिरात होत असलेल्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजपाचे विक्रमकाका शिंदे, तुकाराम गोरे, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, भागवत सोट, ॲड. दशरथ सरवदे बन्सी भिसे यांची प्रमुख उपस्थिती होती.







प्रदीर्घ संघर्षानंतर प्रभू श्रीराम यांच्या भव्य आणि दिव्य मंदिराची उभारणी आयोध्या नगरीत होत आहे. या मंदिरात येत्या २२ जानेवारी रोजी होत असलेल्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमित्ताने देशभरातील गावागावात मोठा आनंद उत्सव साजरा केला जात असून लातूर जिल्ह्यातील जनता ही उत्स्फूर्तपणे या आनंद सोहळ्यात सहभागी होत आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील जवळपास साडेपाचशे हून अधिक विविध देव देवतांच्या मंदिरात स्वच्छता करण्यात आली. अनेक ठिकाणी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, गावागावात भजन, कीर्तन, प्रवचन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. आकाश कंदील दिवे मोठया प्रमाणात लावले जात आहेत, महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे एकूणच सर्वत्र राममय वातावरण निर्माण झाले आहे.

२२ जानेवारी नंतर प्रत्येकाच्या घरी प्रभू श्रीरामाची पूजा व्हावी यासाठी २१०० रामाची मूर्ती आणि मिठाई वाटप करत असल्याची सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पत्रकार बंधूंनी या उत्सवात सहभागी व्हावे उत्सवाच्या विविध कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी द्यावी. रामेश्वर ता.जि. लातूर येथील माझ्या जन्मगावी प्रभू रामाचे भव्य मंदिर आहे, या मंदिरातही २२ जानेवारी रोजी मोठा आनंद उत्सव साजरा केला जात असून यानिमित्ताने सकाळी ९ वाजता शोभायात्रा सकाळी ११ वाजता परमपूज्य महंत रामकृष्ण महाराज शास्त्री यांचे कीर्तन, त्यानंतर आयोधीतील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण होणार असून, महाप्रसादानंतर कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. तेव्हा याही कार्यक्रमास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असेही आवाहन भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

आयोध्या येथील श्रीराम मंदिराकरीता १९९० साली झालेल्या कारसेवेत सहभागी झाल्याबद्दल चंद्रकांत सुर्यकांत कातळे यांचा भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी प्रभू रामाची मुर्ती देवून सत्कार केला.

## अयोध्येतील श्रीराम मंदिर निर्माण व्हावं म्हणून लातूरच्या श्रीनिवास संकुलात गेल्या 04 वर्षांपासून होतोय राम रक्षा पठणाचा गजर खा.सुधाकर शृंगारे यांची भेट

लातूर : अयोध्येत भव्य श्रीरामाचे मंदिर व्हावे म्हणून लातूर शहरातील जोशीज् श्रीनिवास संकुलात २०२० पासून रामरक्षा पठण केले जाते आहे. अवघ्या दोन दिवसावर अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापनेपूर्वी येथील रामरक्षा पठणाच्या उपक्रमाला लातूरचे खा.सुधाकर शृंगारे यांनी भेट देऊन कौतुक केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे, योगानंद जोशी, सौ.स्वाती जोशी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. अयोध्येत प्रभु श्रीरामाचे भव्यदिव्य मंदिर व्हावे, देशामध्ये शांतता प्रस्थापित राहून आपला देश एक संघ राहावा अशी प्रार्थना या राम रक्षा पठाणातून केली जात होती. श्रीनिवास संकुलातील लहान मुलं-मुली, नागरिकांच्या उपस्थितीत गेल्या ०४ वर्षांपासून राम रक्षा पठण सौ. स्वाती योगानंद जोशी व सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात होता. या उपक्रमास लातूरचे भाजप खा.सुधाकर शृंगारे




यांनी भेट देऊन राम रक्षा पठण उपक्रमात हजेरी लावली. येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येतील मूळ जागी भव्य-दिव्य मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत असल्याचा आनंद यावेळी व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी भेट दिल्यानंतर आपल्या मनोगतात बोलताना खा. सुधाकर शृंगारे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या मंदिर व्हावे हे भाजपच्या जाहीरनाम्यात होतं. मात्र आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात हे मंदिर पूर्ण होत असल्याचे समाधान खा. शृंगारे यांनी यावेळी व्यक्त केले. तर देशाची भावी पिढी अर्थात लहान मुलं संस्कारक्षम बनविण्यासाठी, लहान मुलांना मोबाईल-टीव्ही सारख्या गॅझेटपासून दूर ठेवण्यासाठीही या राम रक्षा पठणाचा मोठा उपयोग झाल्याचे संकुलातील रहिवासी संजय राजुळे यांनी यावेळी स्पष्ट केले. याप्रसंगी भागवत भोसले, संतोष सोनवणे, पत्रकार शशिकांत पाटील, आर्मी सुभेदार, माधव तरगुडे, सावित्रा राजुळे, श्रध्दा बुद्रे, भक्ती बुद्रे, राधा कासले तसेच संकुलातील रहिवासी नागरिक तसेच मुला-मुलींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## २५ तारखेला जागावाटप जाहीर करणार

मुंबई : लोकसभा निवडणूक तोंडावर आली आहे. अशातच जागावाटपाचा मुद्दा चर्चेत आहे. लोकसभेच्या जागावाटपावरून इंडिया आघाडीत मतभेद असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. यावर जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या चर्चांवर त्यांनी पडदा टाकला आहे. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. इंडिया आघाडीची २ दिवसांत बैठक पार पडेल. २५ तारखेला जागावाटप जाहीर होईल. एकत्रित जागावाटप बैठक त्याच दिवशी आहे. कोणत्याही प्रकारचे वाद आमच्यात नाहीत, असे जयंत पाटील यांनी जाहीर केले.आज आमची सुनावणी पार पडली. समोरच्या बाजूने वेळ मागितला. शरद पवार हे सर्वांना बोलवायचे आणि निर्णय घ्यायचे प्रांताध्यक्ष म्हणून, अध्यक्ष म्हणून तटकरे यांनी दीर्घकाळ काम केले आहे. शरद पवार यांनी एकांगी कधीही निर्णय घेतला नाही, असे जयंत पाटील म्हणाले.



शिवसेनेच्या आणि राष्ट्रवादीच्या सुनावणीमध्ये फरक आहे. आम्ही पूर्वानुभवानुसार घटनेमध्ये काही बदल केलेले आहेत. आम्ही योग्य खबरदारी घेतलेली आहे. अजित पवार गटाने मुदतवाढ मागितली आहे. आमच्या वकिलांनी त्यांना विरोध केला पण अध्यक्षांनी वेळ मागितला. अनिल पाटील हे २०१९ मध्ये आमच्या पक्षात आले. आमचा पक्ष कसा चालतो, त्यांना माहीत नाही, असेही जयंत पाटील म्हणाले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# दु:ख स्वाभाविक आणि आनंद संशयास्पद!

आताच्या धकाधकीच्या जगण्यात मानसिक ताणतणाव वाढत आहेत, हा विषय चघळून चघळून कुठल्याही माराचा कसलाही परिणाम न होणार्या निबर झालेल्या कातडीसारखा झाला आहे. नातेसंबंध, व्यवसाय, कार्यालयातील कामाचा ताण, कौटुंबिक जीवनातील ताणतणावामुळे त्याचे परिणाम शारीरिक पातळीवरही वाढत आहेत. यातून उच्च रक्तदाबाची समस्या वाढू लागली आहे. कलेला मिळणारी दाद, चांगुलपणाचं कौतुक, हळवेपणा, समजूतदारपणा, निखळ आनंदी हास्य, तणाव विरहित चेहरा पाहिल्यास चिंता व्यक्त केली जात आहे. दुःख स्वाभाविक मानलं जातंय, तर आनंद ही संशयास्पद गोष्ट झाली आहे. नियमित जगण्यातील ताणतणावाच्या दुष्टचक्रानं माणसाला घेरलेलं वेद-नेचं जगणं अंगवळणी पडलंय.लोकल ट्रेनच्या रोजच्या प्रवासात किरकोळ कारणावरून हमरीतुमरीवर येऊन वेळप्रसंगी एकमेकांना गंभीर जखमी करण्यापर्यंतच्या हाणामार्या नव्या नाहीत. सकाळ-संध्याकाळ गर्दीच्या वेळेत हे प्रकार जास्त होतात. अनेकदा इतर ताण-तणाव चिडचिड बाहेर काढण्याचा मार्ग लोकल ट्रेनच्या प्रवासात सापडणं धोक्याचं असतं. केवळ पाहिल्यानं, धक्का लागल्यानंही होणारी प्रवाशांची चिडचिड ही मानसिक ग्लानी, उच्च रक्तदाबाचा परिणाम असतो. सामान्य माणसांचं जगणं लोकल इंडिकेटरच्या वेळेला बांधलेलं असतं. घरातल्या कौटुंबिक जबाबदार्या, आजारपणं, मुलांचं शिक्षण, रेशनपाणी, कर्जाचे हप्ते आणि बदलत्या भवतालसोबत समांतर धावणारं. आयुष्याला लोकलचा वेग पकडावा लागतो. कोविड काळानंतर गेलेल्या नोकर्या, डबघाईला आलेल्या छोट्या-मोठ्या व्यवसायांनी आता कुठे परिस्थिती स्थिरस्थावर व्हायला लागली आहे. अशा वेळी उच्च रक्तादाबासारखे आजार डोकं वर काढू लागले आ-हेत. यातही एन्झायटी (भीती) वाढली आहे. ही भीती भविष्याप्रती असते.बरेचदा माणूस भूतकाळात रमत असतो आणि भविष्याची स्वप्ने रंगवत असतो. हे असं झालं तर बरं होईल, तर हे असं यापुढे व्हायला नको, तर भूतकाळाबाबत हे असं झालं, खूप वाईट झालं, हे असं झालं ते खूप उत्तम चांगलं झालं. दोन्हीकडे चांगल्या कल्पना आणि वाईट आठवणी असतात, मात्र जगणं वर्तमानातच असतं. या वर्तमानाचा बळी कायमच भविष्यातल्या कल्पना आणि भूतकाळातल्या भीतीसाठी दिला जातो. हे सगळं नकळत होत असतं, जगणं इतकं गुंतागुंतीचं आणि धकाधकीचं झालेलं असतं की या दोन्ही कल्पना आठवणीतून वर्तमानातल्या क्षणासाठी वेळ काढणं केवळ अशक्य असतं आणि हेच जगणं असतं, या भ्रमात माणूस कायम असतो. या ओढाताणीत उच्च रक्तदाब वाढत जातो.पोषक आहार, वेळेचं नियोजन हे सुखवस्तूंसाठी असावं, ज्या ठिकाणी आपल्या उदरनिर्वाहासाठी रोजगाराची खात्री नसते, त्या ठिकाणी जगण्यातल्या वेळ इतर कामांसाठी विकला जातो. या वेळेच्या विक्रीतून माणसाचं जगणंच संपूर्णपणे लिलावात काढलं जातं, जो जास्त किंमत देईल, त्याच्या माणसांचे क्षण नि क्षण जगण्यासह ताब्यात दिले जातात. नातेसंबंधांवरही मानवी असुरक्षिततेचा पुरता प्रभाव पडलेला आहे. लग्न, सोयरीक ही भविष्यातली आर्थिक सुरक्षितता पाहून जुळवली जाते. या ठिकाणी प्रेम, जिव्हाळा, आत्मियता आवडनिवड या दुय्यम असतात. यातून वैवाहिक संबंधातला तणाव वाढत जातो. पुढे हा तणाव मानसिक, शारीरिक आजारांना कारण ठरतो. मोबाईल, इंटरनेटमुळे घराघरातला संवाद कमी होऊन नातेसंबंध प्रमाणाबाहेर संकुचित होत जातात. जगण्याचं संतुलन राखताना ही कसरत हाताबाहेर जाते.देशात सर्वाधिक कारणांनी मृत्यू होणार्या व्याधींमध्ये उच्च रक्तदाब एक महत्वाचं कारण असतं. वैद्यकीय भाषेत हळूहळू दबक्या पावलांनी येणारा मृत्यू असंही म्हणतात. उच्च रक्तदाब वाढीस लागतो. याची लक्षणे सामान्यपणे लवकर लक्षात येत नाहीत, त्यामुळेच धोका वाढत असतो. यातून अचानक येणारा हृदविकाराचा धक्का, पक्षाघात असा कमालीचा धोकादायक असतो. चिंता आणि चिता यात केवळ एकाच अनुस्वाराचा फरक असतो. जगण्यातली वेळ उदरनिर्वाहाच्या शर्यतीत गहाण पडल्याने नाईलाजाने माणसाला वेठबिगारी आयुष्य जगावे लागते.बरेचदा सुखाच्या संकल्पना बाहेरच्या व्यावसायिक जगाने चुकीच्या पद्धतीने बदललेल्या असतात. त्यात कर्ज काढून घर घ्यायलाच हवं, आजच्या जगात गाडी घ्यायलाच हवी, नव्या महागडा मोबाईल, फ्लॅट स्क्रिन टीव्ही, अगदी कपड्यांच्या बाबतीतही पुरेशा गरजेच्या नसलेल्या गोष्टीही मार्केटींगमध्ये माथी मारल्या जातात. बाहेरच्या व्यावसायिक मूल्यांमध्ये कमालीच्या स्पर्धा असल्याने माणसांचं जगणंच एक बाजारमूल्य होऊन जातं. हे माणसाचं झालेलं बाजारमूल्य टिकवण्यासाठी कर्जे काढली जातात, वर्षानुवर्षे ती फेडली जातात.

# बुद्धांच्या देशात बुद्ध कुठेत..?

बुद्धांच्या देशात बुद्ध कुठेत असा प्रश्न विचारला तर काही लोकांना वाटेल की हा काय प्रश्न आहे का? भारत हा बुद्धांचाच देश आहे. परंतु प्रश्न शांततेने आणि चिंतन करून वाचला तर मग मात्र उत्तर शोधायला डोके तयार होईल. परंतु या प्रश्नाचे उत्तर त्यालाच लवकर सापडेल ज्याला बुद्ध कळालेले आहेत. मानव जातीच्या कल्याणासाठी राजवैभवाचा त्याग करून केवळ मानसाचे सुख श्रीमंतीमध्ये नाही तर स्वभावामध्ये आहे, मानसाचे सुख विषमतेमध्ये नाही तर शांती मध्ये आहे, माणसाला सुख मिळत नाही तर ते कर्माने निर्माण करावे लागते, माणवाचा उद्धार कोणतीही दैवशक्ती करू शकत नाही तर उद्धार करण्यासाठी स्वतः ला झिजावे लागते, अज्ञान सोडून विज्ञान देणारा, काल्पनिक सोडून सत्य दाखवणारा बुद्धांचा धम्मच हा जगाला आजही मार्गदर्शक ठरत आहे. बुद्धांचे विचार समता, बंधुता, न्याय, विज्ञान व कर्म यावरच आधारलेला आहे. कोणतीही गोष्ट घडण्यामागे काहीतरी कारण असते आणि हेच कारण म्हणजे विज्ञान होय. हजारो वर्षापुर्वी राजवैभव सोडून मानवकल्याणाचा विचार डोक्यात येणे म्हणजे हिच क्रांती होय. बुद्ध तत्वज्ञानात, बुद्ध विचारात, बुद्धाच्या धम्मात विश्वकल्याणाचा मार्ग आहे. परंतु वास्तविक आपण विचार केला तर देशात बुद्ध कुठे आहे हे शोधावे लागते. जगातील लोक भारत बुद्धांची भूमी असल्याने आदर मान सन्मान करतात. भारतातील लोक विदेशात गेल्यावर गर्वाने आम्ही बुद्धांच्या देशातुन आलोय म्हणून सांगतात. परंतु देशात काय परिस्थिती आहे. बुद्धांच्या विचारधारेच्या विरोधात काम सुरू आहे. रोज बुद्धांचे विचार पायदळी तुडवले जात आहेत. देशात बुद्ध कुठेत तर मोठमोठ्या बंगल्यात फोटो आणि मूर्तीत बुद्ध आहे, पहाडामध्ये अवाढव्य आकाराच्या दगडात कोरलेला बुद्ध आहे. गावोगावी विहारात बुद्ध आहे, जमीनीखाली बुद्ध आहे, मंदिरात बुद्ध आहे, अरे बुद्ध तर सर्वत्र आहे. मंदिरात बुद्ध असल्याच्या रिल्सही आम्ही शेअर करतो. म्हणजे बुद्ध अजूनही देशात आहेच हिच भावना आज बहुतांश लोकांची आहे. परंतु बुद्ध फक्त मुर्ती, विहार, मंदिरात बंधिस्त होणारे आहेत का? बुद्ध म्हणजे फक्त मुर्ती लेणी आणि दैविकरण करून मंदिरात ठेवलेली प्रतीमा म्हणजे बुद्ध का? तर नाही. कारण बुद्ध फक्त एक व्यक्त नाही तर विचार आहे, आचार आणि संस्कार आहे. म्हणून बुद्ध शोधायचाच तर विचारात, आचारात आणि संस्कारात शोधावा लागणार आहे. जो पर्यंत आपण बुद्ध विचारात, आचारात आणि संस्कारात शोधणार नाही तोपर्यंत बुद्ध कळणार नाहीत. आणि जेव्हा आपण बुद्ध विचार, आचार आणि संस्कारात शोधायला लागु तेव्हा कळेल बुद्धांच्या देशात बुद्धांचे विचार, आचार आणि संस्कार किती लोक पाळतात? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्माची दिक्षा दिल्यानंतर भारतात विहारांची संख्या नक्कीच वाढली पण विचाराच काय? विहार बांधण्यामागचा नेमका उद्देश काय? बऱ्याच विहारांना कुलुप लावलेले असते. ते कुलूप कशासाठी आहे हे अजूनही न उलगडलेले कोडे आहे. विहार बांधले चांगली गोष्ट आहे परंतु तेथे रोज चर्चा व्हायला पाहिजे, बुद्ध, धम्म समजून घेतला पाहिजे, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्याला व विचाराला नियमित उजाळा मिळाला पाहिजे, परंतु असे होत नाही म्हणून बुद्धांनी जगाला जरी विज्ञान दिले असले तरीही भारतात मात्र अजूनही अज्ञान आहे. आणि याच अज्ञानातून अंधविश्वास, पाखंड, थोतांड, भोंदुगीरी जन्म घेते आणि बुद्धांच्या विज्ञानवादाची विचाराची थट्टा केली जाते. बुद्धांने शांती आणि समता देऊन सम्यक मार्ग दिला. परंतु याच देशात विषमतेचे विष पेरून दंगलीच्या स्वरूपात शांतीचा भंग केला जातो. बुद्धाने सम्यक मार्ग देऊन आदर्श जिवनाची शिकवण जरी दिली असली तरीही ती शिकवण किती लोकांना कळाली? कळालेल्या लोकांनी किती स्विकारली व इतरांना सांगितली? जर बुद्धाची शिकवण आणि संस्कारच आम्हाला कळाले नसतील तर बुद्ध शोधायचा कुठे हा गहन प्रश्न निर्माण होतो. विहारात जाताना, काही कामाची सुरवात करताना आपण पंचशील ग्रहन करतो. पंचशील ग्रहन करतो म्हणजे काय करतो. फक्त पंचशील हे पाली भाषेतील बोलुन दाखवतो. वास्तविक पंचशीलेचे पालन आपण कधी करतो? बुद्धांचे पंचशीले आपण मराठीत उच्चारून देशातील सर्व मानसाला का सांगत नाही? डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्म दिक्षा घेताना दिलेल्या बावीस प्रतिज्ञा म्हणजे बुद्ध धम्माचा सार आहे. हाच सार आपण स्वतः समजून घेऊन त्याचा प्रचार आणि प्रसार का होत नाही? देशात अंधविश्वास, पाखंड, थोतांड भोंदुगीरी वाढली धर्मांधता वाढली असे सहज बोलतो. परंतु अंधविश्वास, पाखंड, थोतांड भोंदुगीरी कायम रहावी म्हणून ते चोवीस तास काम करतात. बुद्धाला माणणारे लोक किती वेळ बुद्ध विचाराचे काम करतात. देवाचे भांडवल बनवून मंदिराच्या माध्यमातून ब्राह्मण पुजारी बनुन स्वतः चे पोट भरतात व इतरांना मुर्ख बनवतात अशी ओरड नेहमीच असते. ते बरोबर ही आहे. पण बुद्धांचा कर्म सिद्धांत आपण लोकांना कधी सांगतो. ब्राह्मण त्यांचे अस्तित्व व वर्चस्व कायम राहण्यासाठी परिस्थिती नुरूप बदल करून त्यांचे विचार लोकांना अज्ञानी ठेवण्याचे का असेना पण अहोरात्र वेगवेगळ्या माध्यमातून करतात. आणि बुद्धांच्या विचाराचा प्रचार प्रसार कधी आणि कुठे होतो? अनेक बुद्ध मुर्तीचे दैविकरण करून त्याचे मंदिर बनवले, मंदिर बनवून अज्ञान व अंधविश्वास पसरवून ते त्यांचे काम करत आहेत आपण काय करतोय? कधीतरी दैविकरण केलेल्या बुद्धाला मुळ स्वरूप आणुन मंदिराचे विहार बनवण्याचा विचार डोक्यात येतो का? आठशे वर्षाची मशीद पाडून मंदिर बांधण्यात ते यशस्वी झाले. आपण मंदिर बांधले म्हणून मंदिराला विरोध करत आहोत. पण उत्खननात बुद्ध मुर्ती च मिळाल्या, आताचे अयोध्या पुर्वी च साकेत हे बौद्ध ठिकाण होते, ऐतिहासिक पुरावे असताना ही आपली काय भुमिका होती? असत्य, अज्ञान जरी असले आणि वारंवार सांगितले गेले तर तेच सत्य आणि ज्ञान बनते. आम्ही ठराविक दिवशी च काही कार्यक्रम घेतो. त्यामध्ये ही प्रबोधन कमी आणि मनोरंजन व द्वेष जास्त असतो. बुद्ध आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर सांगताना वैयक्तिक द्वेष सांगुन काय साध्य करायचे हा संशोधनाचा विषय आहे. स्वतः ला बुद्धाचे अनुयायी समजणारे लोक च बुद्धांचे विचार समजून घेऊन आचरणात आणत नाहीत हि वस्तुस्थिती नाकारून कसे चालेल. जर ब्राह्मण लोक स्वतः चे वर्चस्व व अस्तित्व कायम राहण्यासाठी बुद्धांच्या देशात बुद्धांच्या विरोधात काम करतात तर बुद्धाच्या देशात बुद्धाच्या विचाराचे काम करायला ब्राम्हणांनी तर मज्जाव केला नाही. मग बुद्धांच्या विचाराचे विज्ञानवादाची व लोककल्याणकारी विचार माणसा पर्यंत पोहचवण्याचे नियोजनच नसेल तर बुद्धांचे खरे व कल्याणकारी विचार लोकांना कळतील तरी कसे? बुद्धांचे विचार स्विकारून त्याचा प्रचार करण्यात आपण कमी पडलो हे सत्य जोपर्यंत आपण स्विकारणार नाही तो पर्यंत यशस्वी नियोजन करता येणार नाही. सर्वात मोठी खेदाची बाब म्हणजे बौद्ध ठिकाण असलेल्या स्थळाचे नाव बदलले जाते, मशीद पाडली जाते, आणि तेथे मंदिर बांधले जाते हे त्यांच्या विचाराचा, मेहनतीचा आणि सातत्याचा विजय आहे. दोन दिवस मंदिराला विरोध करून शांत बसु पण ते त्यांचा अजेंडा कधीच खंडित होऊ देत नाहीत. आणि आपण आपल्या अजेंड्यावर कधीच एकत्र येऊन सातत्य ठेवत नाही. बुद्धाच्या देशात जगातील सर्वात मोठे संशोधन केंद्र, जगातील सर्वात मोठे विद्यापीठ, जगातील सर्वात मोठे शास्त्रज्ञ व जगाला प्रेरणा मिळेल असा विकास पाहिजे होता. परंतु येथे अंधविश्वास , भक्त, अज्ञान आणि भोंदुगीरी वाढली आहे. विषमतेच्या जोरावर राजकारण केले जात आहेत. यामध्ये बुद्धांचे शुद्ध विचार कुठेच दिसत नाहीत. म्हणून प्रश्न पडतो. बुद्धांच्या देशात बुद्ध कुठे आहेत?

************

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

# आजकाल ज्याच्या कानात 'शेंगदाणा', त्यालाच मिळते सरकारी नोकरी?

गणेश काळे हा बीड जिल्ह्यातील एक बेरोजगार तरुण. गेल्या पाच वर्षांपासून त्याची शासकीय नोकरीसाठी पायपीट सुरू आहे. स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठीचा खर्च मोठा असतो. तेवढी ऐपत नाही म्हणून गणेशने सारे लक्ष सरळ सेवा भरतीवर केंद्रित केलेले. राज्यातील जिल्हा परिषद व तलाठीची भरती जाहीर झाल्यावर त्याने फुटपाथवर दुकान चालवणाऱ्या भावाकडून ३० हजार रुपये उसने घेतले व अनेक ठिकाणी अर्ज केले. पोलीस भरतीसाठी तो सहा जिल्हे फिरला. पण पोलीस भरतीसाठी शरीरयष्टी योग्य नसल्याने त्याची संधी हुकली. पोलीस नाही तर आता तलाठी तरी व्हायचेच म्हणत त्याने कसून अभ्यास केला. परीक्षेच्या काळात पेपरफुटीच्या बातम्यांनी तो अस्वस्थ होताच, तरीही त्याने मन लावून परीक्षा दिली. पण निकालानंतर त्यातही घोळ झाल्याचे दिसताच अस्वस्थ झालेल्या गणेशने शेतात जाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूचे लोक धावले आणि त्यांनी त्याला झाडावर गळफास घेण्यापासून परावृत्त केले. गणेशला वडील नाहीत. आई शेतमजुरी करते. भावाने उसनवारीसाठी तगादा लावलेला. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या गणेशसमोर आता मोठा अंधार पसरला आहे.लखन खटाणे हा सुद्धा बीडचाच. गेल्या पाच वर्षांपासून तो नोकरीच्या प्रतीक्षेत आहे. म्हाडाच्या परीक्षेत तो प्रतीक्षा यादीत क्रमांक एकवर होता. स्पर्धा परीक्षेत त्याची दोनदा चार गुणांनी संधी हुकली. तलाठी परीक्षेत त्याला दोनशेपैकी १८० गुण मिळाले पण दोनशेपेक्षा जास्त गुण मिळवणारे बघून तो हैराण झालाय. आता पुढे काय हा प्रश्न त्याच्यासमोर आ वासून उभा आहे.राज्याच्या कोणत्याही भागात गेले तरी असे कितीतरी गणेश आणि लखन भेटतात. लाखोच्या संख्येत असलेली ही तरुणाई सध्या अस्वस्थतेचे ओझे घेऊन जगतेय. त्यामागचे एकमेव कारण म्हणजे परीक्षेत होणारे गैरप्रकार. करोना काळानंतर झालेल्या आरोग्य खात्यातील भरतीपासून याचे ग्रहण लागले. त्यानंतर आठ परीक्षा राज्यात झाल्या. त्यातल्या पाचचे पेपर फुटले, सामूहिक कॉपीचे प्रकार घडले. यातली बहुतांश प्रकरणे उघडकीला आणली ती याच विद्यार्थ्यांनी. मग ते अहमदनगर असो, संभाजीनगर असो वा मुंबई. पिंपरी चिंचवड, बीड, नागपूर येथील गैरप्रकारही याच विद्यार्थ्यांनी उघडकीला आणले होते.परीक्षा जाहीर झाल्यावर तयारी करायची, कसून अभ्यास करायचा. ती दिली की जिथे कुठे गैरप्रकार घडल्याचे कानावर आले असेल तिथे समूहातील एकदोघांनी धाव घ्यायची. त्यांच्या तिकीट खर्चासाठी इतर सर्वांनी वर्गणी गोळा करायची. गैरप्रकार कसा घडला ते शोधल्यावर पोलीस ठाणे गाठायचे. तक्रार द्यायची. गुन्हा दाखल झाला की माध्यमांकडे धाव घ्यायची. बातम्या प्रकाशित झाल्या की सरकारवर दबाव आणण्यासाठी आंदोलने करायची. नेहमीप्रमाणे सरकारने लक्ष दिले नाही की निराश व्हायचे. काही दिवस याच अवस्थेत काढल्यावर पुन्हा मनाला उभारी देत नव्या परीक्षेच्या तयारीला लागायचे.राज्यातील सुमारे तीस लाख तरुणांच्या जगण्याचा हा क्रम असा ठरलेला. परीक्षार्थींही तेच आणि जागल्याच्या भूमिकेतही तेच. हे चित्रच चीड आणणारे, सरकारच्या बेपर्वा वृत्तीवर नेमके बोट ठेवणारे आहे. या तरुणांचा कुणीही नेता नाही. राहुल कवठेकर आणि नीलेश गायकवाड हे माध्यमांना या विषयावर प्रतिक्रिया देतात म्हणून ते चर्चेत आहेत. प्रत्यक्षात तेही परीक्षार्थीच. त्यामुळे साऱ्यांच्या तक्रारींचा पाऊस या दोघांच्या मोबाईलमध्ये साठवलेला असतो. या तरुणांची लाखाच्या घरातील संख्या बघून राजकारणी आणि त्यातल्या त्यात विरोधी पक्षांचे नेते या समूहाकडे राजकीय आशेने आकर्षित झाले आहेत. पण त्यांचा सहभाग केवळ आंदोलनापुरता असतो. एखादा नेता जरा जास्तच कनवाळू निघाला तर तो आंदोलनासाठी थोडीफार पैशाची मदत करतो, बाकी काही नाही. त्यामुळे राज्यात सत्ता बदलली की या आंदोलनात सहभागी होणाऱ्या नेत्यांचे चेहरे बदलतात, प्रश्न मात्र कायम राहतो, हेही या तरुणांच्या अंगवळणी पडलेले आहे. गैरप्रकाराविरुद्ध न्यायालयात दाद मागावी तर पैशाचा प्रश्न नेहमीच समोर उभा असतो. एका प्रकरणात दाद मागण्यासाठी 'आप'च्या धनंजय शिंदेंनी आर्थिक मदत केली होती. इतर नेत्यांनी केवळ तोंडपाटीलकी केली. या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची सरकारने दखल घेतली, चर्चेसाठी बोलावले असे तर फारच क्वचित घडले आहे. गैरप्रकार हा एक भाग झाला पण त्यांच्या एकूण मागण्या काय, त्यातल्या काही मागण्या तरी मार्गी लावता येतील का यावर साधा विचारही सरकारकडून आजवर झालेला नाही. पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदा आणि राजस्थानप्रमाणे वर्षाला एकदाच नाममात्र शुल्क भरल्यावर कोणतीही परीक्षा देण्याची सवलत मिळावी या मागण्या सहज मान्य करता येण्यासारख्या आहे. पण सरकार त्यांच्याकडे लक्ष द्यायलाच तयार नाही. विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन त्यांची परीक्षा त्या त्या जिल्ह्यात घ्यावी ही मागणीही शक्यतेच्या कोटीमधली आहे. टीसीएस कंपनीने हेच लक्षात घेत उमेदवारांना जवळच्या परीक्षा केंद्राचे पर्याय दिले. पण प्रत्यक्षात हॉल तिकीट मिळाले ते दूरच्या जिल्ह्याचे. ही फसवणूक लक्षात येऊनसुद्धा सरकारी पातळीवर फारशी हालचाल झाली नाही. खासगी कंपन्यांनी अनेक संगणक प्रशिक्षण केंद्रांची परीक्षा केंद्र म्हणून निवड करणे सुरू केल्यावर याचे पेवच राज्यात फुटले. अनेकांनी शंभर संगणक विकत घेत अशी केंद्रे चक्क गोदामात सुरू केली. या




केंद्रात गैरप्रकार होऊ नये म्हणून ते सुरु करणाऱ्यांसाठी कडक नियम करावेत, शासनाच्या परवानगीची अट टाकावी अशी या विद्यार्थ्यांची मागणी आहे. त्याकडेही दुर्लक्ष झाले आणि गैरप्रकार करून नव्याने उदयाला आलेले हे केंद्रचालक अल्पावधीत कोट्यधीश झाले. यातले बहुतांश राजकारण्यांच्या जवळचे आहेत, असे सांगितले जाते.अलीकडे उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन परीक्षेचा पेपर फोडण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. चीन आणि दक्षिण कोरियातून आयात केलेले उच्च दर्जाचे डिव्हाईस दिल्ली आणि गुरुग्रामच्या बाजारात सहज मिळते. यात शेंगदाण्याच्या आकाराचे एक यंत्र असते. ते परीक्षार्थीने कानाला लावायचे असते. ब्ल्युटुथचा वापर करून त्यावर संवाद साधता येतो. या डिव्हाईसची चीप एटीएम कार्डसारख्या दिसणाऱ्या कार्डात बसवता येते. ते खिशात ठेवायचे. परीक्षा केंद्रावर गेल्यावर संगणकासमोर हे कार्ड धरले की त्यात बटनाच्या आकाराचा असलेला कॅमेरा समोर येणाऱ्या प्रश्नांचे छायाचित्र घेतो आणि ते लगेच बाहेर पाठवता येते. बाहेर प्रश्न सोडवणारी टोळी तयारच असते. ती लगेच आतल्याला उत्तर सांगते. ज्याच्या कानात 'शेंगदाणा' त्याला ते ऐकू येते. हे तंत्रज्ञान जॅमरवर मात करणारे आहे. आंदोलनाला भेट देणाऱ्या अनेक नेत्यांना या विद्यार्थ्यांनी त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. पोलिसांनासुद्धा ते कसे काम करते हे दाखवले. पण या गैरप्रकाराची पाळेमुळे खणावी असे सरकारला अजून वाटलेले नाही. याचा वापर करून पेपर फोडणारी एक टोळी मराठवाड्यात सक्रिय आहे. कन्नड, बैजापूर व जालना भागात राहणारे एकाच जमातीचे लोक यात सहभागी आहेत, असे सांगितले जाते. ही टोळी तलाठी भरती परीक्षेसाठी १५ ते २०, भरती परीक्षेसाठी १० तर अभियांत्रिकी सेवेसाठी ३० लाख रुपये प्रतिउमेदवार उकळते. ही सर्व माहिती विद्यार्थांनी अनेकदा तपास यंत्रणांना पुरवली आहे, पण काहीच कारवाई होत नाही. यामुळे संतापासोबतच एकप्रकारची हतबलता या वर्गामध्ये आता जाणवू लागली आहे.एकीकडे नोकरी मिळत नाही म्हणून घरच्यांकडून परत येण्याचा दबाव वाढलेला असतो. घरी जाऊन शेतीत राबायचे तर मग शिक्षण कशाला घेतले, हा या तरुणांचा सवाल. लाखोंच्या संख्येत असलेल्या या विद्यार्थ्यांची वर्गवारी दोन गटात होते. त्यातला पहिला स्पर्धा परीक्षांची तयारी करणारा तर दुसरा 'सरळ सेवे'वर अवलंबून असलेला. 'सरळ सेवे'त चाळणी, पात्रता, प्राथमिक व मुख्य असा परीक्षाक्रम नसतो. २०० गुणांचा एक पेपर दिला की झाले, त्यामुळे दुसऱ्या गटाची संख्या जास्त असते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांचे मुख्य केंद्र पुणे तर 'सरळ सेवे'साठी तरुण नाशिक, जळगाव, नांदेड, संभाजीनगर, नागपूर अशी ठिकाणे अभ्यासासाठी निवडतात. पुण्याच्या तुलनेत येथील खर्च जरा कमी असतो. चार ते पाच हजारात महिना भागतो. तेही एकवेळ नाश्ता व रात्री जेवण करून. टेलिग्राम हे प या विद्यार्थ्यांचा मुख्य आधार. कारण यावर चॅनलच्या माध्यमातून लाखोच्या संख्येत विद्यार्थ्यांना सामील करून घेता येते. हे लक्षात येताच या पवर सध्या टेस्टसिरीजचा सुळसुळाट आहे. दोन ते पाच हजारांपर्यंतच्या खर्चाच्या या टेस्ट द्यायच्या आणि अभ्यासातील प्रगती बघायची.एवढे करूनही गैरप्रकारामुळे नोकरी मिळत नसेल तर जायचे कुठे, करायचे काय या प्रश्नांनी या वर्गाच्या मनात सध्या काहूर माजवले आहे. या तरुणांमध्ये व्यवस्थेविषयी, ती संचालित करण्याची जबाबदारी असलेल्या सरकारविषयी विश्वास निर्माण करायचा असेल तर भरती प्रक्रिया पारदर्शक हवी. त्यासाठी राज्य लोकसेवा आयोग हाच एकमेव पर्याय. मात्र त्यावर सरकारकडून नुसती चालढकल सुरू आहे. अशा स्थितीत दाद तरी कुणाकडे मागायची, अभ्यास करायचा की आंदोलनेच करत राहायचे, या प्रश्नांनी हे लाखो तरुण अस्वस्थ आहेत.

## हिवाळ्यात हातापायांची बोटे सुजल्यामुळे त्रस्त आहात? मग हे उपाय ट्राय करून पाहा, लगेच मिळेल आराम

थंडीमुळे पायांच्या बोटांना सूज आलीय का? हे घरगुती उपाय देतील जलद आराम हिवाळ्यात हातापायांची बोटे सुजल्यामुळे त्रस्त आहात? मग हे उपाय ट्राय करून पाहा, लगेच मिळेल आराम हिवाळ्यात आरोग्याशी संबंधित अनेक समस्या उद्भवतात. यामध्ये सर्दी, खोकला, ताप, पोटाशी संबंधित समस्या आणि हातापायांच्या बोटांना सूज येणे यांचा समावेश आहे. हिवाळ्यात त्वचा कोरडी होते. त्यामुळे त्वचेशी संबंधित अनेक प्रकारच्या समस्या पाहायला मिळतात.विशेषत: ज्या महिला घरी पाण्यात जास्त काम करतात त्यांच्यावर त्याचा परिणाम अधिक दिसून येतो. हिवाळ्यात, आपल्या रक्तवाहिन्या आकसतात, ज्यामुळे आपण हे पाहतो. यावर मात करण्यासाठी अनेक घरगुती उपाय प्रभावी आहेत. तुमच्या घरात असलेल्या अनेक गोष्टींचा वापर करूनच तुम्ही या समस्यांपासून आराम मिळवू शकता.हळदीच्या तेलामुळे आराम मिळेल हळदीचे तेल बोटांची आणि पायाची सूज दूर करण्यासाठी प्रभावी आहे. मोहरीच्या तेलात हळद टाकून गरम करा. हळदीमध्ये असलेले औषधी आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म बोटांची सूज आणि संसर्ग कमी करतात. या हळदीच्या तेलाने मसाज करा. याशिवाय तुम्ही मोहरीच्या तेलात सैंधव मीठ मिसळूनही मसाज करू शकता.हळद आणि मध लावा हळद आणि मध यामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे स्किनची स्वेलिंग कमी होते. कच्ची हळद बारीक करून त्यात मध घालून बोटांवर लावा. यामुळे वेदना आणि सूज यापासून आराम मिळेल. कांद्याचा रस लावा कांद्यामध्ये अँटी-सेप्टिक आणि अँटी-बायोटिक गुणधर्म असल्यामुळे शरीरातील सूज कमी होते. हिवाळ्यात बोटांमध्ये जळजळ आणि खाज सुटण्याचा त्रास असलेल्यांनाही यामुळे आराम मिळतो. हिवाळ्यात हातापायांची बोटे सुजत असतील तर ती कमी करण्यासाठी कांद्याचा रस लावा. नंतर ते पाण्याने पूर्णपणे स्वच्छ करा.



## डोळ्यांची दृष्टी सुधारण्यासाठी उपयुक्त आहे कांदा, जाणून घ्या 'हे' फायदे

कांद्यामध्ये मोठ्या प्रमाणात सोडिअम, फोलेट, पोटॅशिअम, व्हिटॅमिन , कॅल्शिअम, फॉस्फरस आणि मॅग्नेशिअम इत्यादी पोषकघटकांचा समावेश आढळून येतो.अनेक खाद्यपदार्थांमध्ये आवर्जून वापरला जाणारा कांदा हा आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. कांद्यामध्ये मोठ्या प्रमाणात सोडिअम, फोलेट, पोटॅशिअम, व्हिटॅमिन कॅल्शिअम, फॉस्फरस आणि मॅग्नेशिअम इत्यादी पोषकघटकांचा समावेश आढळून येतो. या सर्व गोष्टींमुळे कांदा हा एक प्रकारचे सुपरफूड ठरतो.जखमा बऱ्या करण्यासाठी आणि केसांच्या वाढीसाठी देखील कांद्याचा वापर केला जातो. यासोबतच अनेकांना जेवणासोबत कच्चा कांदा खायला ही प्रचंड आवडतो. आज आपण या बहुगुणी कांद्याचे आरोग्यदायी फायदे काय आहेत? ते जाणून घेणार आहोत.कांद्याचे आरोग्यदायी फायदे खालीलप्रमाणे : हृदयासाठी आहे लाभदायी कांद्यामध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि थायोसल्फिनेट्स नावाची संयुगे मुबलक प्रमाणात आढळून येतात. विशेष म्हणजे ही दोन्ही संयुगे हृदयाच्या आरोग्यासाठी लाभदायी आहेत.फ्लेव्होनॉईड्स आपल्या शरीरातील खराब कॉलेस्ट्रॉल काढून टाकण्याचे काम करतात. कांद्याचे सेवन केल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो. त्यामुळे, कांदा खाणे हे एकूणच आपल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायी आहे. डोळ्यांची दृष्टी सुधारतेकांद्यामध्ये व्हिटॅमीन सी, फ्लेव्होनॉईड्स आणि अँटीऑक्सिडंट्स इत्यादी पोषकतत्वे आढळून येतात. जे आपल्या शरीराला अनेक रोग आणि संक्रमणांपासून दूर ठेवण्याचे काम करतात. कच्च्या कांद्याचे सेवन केल्याने डोळ्यांची दृष्टी सुधारण्यास मदत होते.कांद्यामध्ये व्हिटॅमीन ए, सी आणि ई इत्यादी व्हिटॅमिन्स भरपूर प्रमाणात आढळतात. हे व्हिटॅमिन्स डोळ्यांची दृष्टी सुधारण्याचे काम करतात आणि डोळ्यांना मजबूत ठेवतात. त्यामुळे, कांद्याचे सेवन करणे हे आपल्या आरोग्यासोबतच डोळ्यांसाठी देखील फायदेशीर आहे.मुरूमांसाठी फायदेशीर आहे कांदा कच्चा कांदा हा मुरूम आणि त्वचेच्या समस्या दूर करण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. हे वाचून तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल. परंतु, हे खरे आहे. कांद्यामध्ये आढळून येणारे सल्फर नावाचे संयुग चेहऱ्यावरील मुरूम शांत करण्यासाठी आणि त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.यामुळे, त्वचा मुलायम आणि स्वच्छ राहण्यास मदत होते. चेहऱ्यावरील पिंपल्स, डाग आणि सूज कमी करण्यासाठी कांदा अतिशय उपयुक्त आहे.




## जेवणानंतर करा 'ही' योग मुद्रा, गॅस व अपचनची समस्या होईल दूर

पोट साफ होण्यासाठी हातांची 'ही' मुद्रा करुन पाहाचं हिवाळ्यात बद्धकोष्ठता आणि ऍसिडिटी सारख्या समस्या आपल्याला त्रास देऊ लागतात. जर तुम्हीही हिवाळ्यात पोटाशी संबंधित आजारांनी त्रस्त असाल तर तज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे हे योगासन रोज करा. अशी अनेक आसने आहेत, जी निरोगी राहण्यासाठी वर्षानुवर्षे केली जातात. त्यामुळे आजारांपासून दूर राहण्यासाठी रोज योगासने करण्याचा सल्ला दिला जातो. यापैकी एक आहे पूषण मुद्रा.ही हाताची मुद्रा सहसा नृत्य, चित्रकला किंवा शिल्पकलेमध्ये वापरली जातात. परंतु तुम्हाला माहित आहे का की मुद्रांचे एक विशेष सांस्कृतिक महत्त्व आहे आणि त्यांचे आरोग्य फायदे देखील आहेत. आज आम्ही तुम्हाला अशा आसनाबद्दल सांगत आहोत ज्याचे वज्रासनात बसून केल्याने अनेक फायदे होतात.पुषन मुद्रा करण्याची पद्धत हे आसन करण्यासाठी जमिनीवर गुडघे टेकून बसा.तुमची पाठ आणि डोके सरळ ठेवा. तुम्ही करंगळी आणि अंगठ्याचे बाजूचे बोट सोडून मधली दोन बोट अंगठ्याजवळ आणा. आता तुम्ही मधली दोन्ही बोटांनी अंगठ्याला हळूवारपणे दाबा. पण बाजूची दोन्ही बोटं एकदम सरळ ठेवा.आता तुम्ही मांडी घालून बसा आणि अपान मुद्रा अवस्थेत हात गुडघ्यावर ठेवा. यात हाताचे तळवे वरच्या दिशेने ठेवा. आता मुद्रा अवस्थेतील बोटांची मांडणी नीट ठेवा हात आणि संपूर्ण शरीराला आराम वाटू द्या.सामान्यपणे श्वास घ्या आणि आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करा.पुषन मुद्राचे फायदे श्वसनाच्या समस्या दूर होतात.बद्धकोष्ठता, ऍसिडिटी आणि गॅस सारख्या पचनाशी संबंधित समस्या दूर करते. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवतो. तणाव कमी होतो.

## चहाऐवजी दिवसाची सुरुवात करा 'लेमन टी'ने ; रोगप्रतिकारशक्ती वाढण्यासह होतील अनेक फायदे

नेहमीचा चहा पिण्यापेक्षा लेमन टी पिण्याचे आहेत भरपूर फायदे अनेकांना लेमन टी प्यायला आवडते. केवळ त्याची चवच नाही तर लेमन टीचे फायदेही अतुलनीय आहेत. जर तुम्ही रोज एक कप लेमन टी प्याल तर तुम्हाला आश्चर्यकारक फायदे मिळू शकतात. विशेषत: आजकाल लोक रोगप्रतिकारक शक्तीसाठी लेमन टीचे सेवन करतात, कारण लिंबूमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते. जे रोगप्रतिकारक शक्तीसाठी खूप महत्वाचे मानले जाते.लेमन टीमध्ये सायट्रिक ऍसिडचे प्रमाण असल्याने, ते वजन कमी करण्यास उपयुक्त आहे आणि इतर अनेक प्रकारे आपल्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. लिंबूमध्ये काही नैसर्गिक घटक असतात जे आपल्या त्वचेसाठी खूप फायदेशीर असतात. याशिवाय, ते तुम्हाला ताजेतवाने ठेवते आणि ते आपल्या शरीरासाठी देखील खूप फायदेशीर आहे. यासोबतच उच्च रक्तदाब असलेल्या लोकांसाठी लेमन टी खूप फायदेशीर मानली जाते.दररोज लेमन टी पिण्याचे आरोग्य फायदे १. उच्च रक्तदाब असलेल्या लोकांसाठी फायदेशीर उच्च रक्तदाबाचा त्रास असलेले लोक दिवसातून एकदा लेमन टीचे सेवन करून रक्तदाब नियंत्रणात ठेवू शकतात. उच्च रक्तदाबावर लेमन टी खूप फायदेशीर मानली जाते. यामध्ये पोटॅशियम आढळते, त्यामुळे उच्च रक्तदाबामध्ये ते खूप फायदेशीर ठरते. सामान्य रक्तदाब राखण्यासाठी हे उपयुक्त ठरू शकते. उच्च रक्तदाब असलेले लोक चहाऐवजी हा लेमन टी घेऊ शकतात.२. रोगप्रतिकारक शक्ती वाढते लिंबूमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. लेमन टीमध्ये रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचा गुणधर्म असतो. याच्या मदतीने तुम्ही अनेक प्रकारच्या आजारांना स्वतःपासून दूर ठेवू शकता. दररोज एक कप लेमन टीचे सेवन करा.३. वजन नियंत्रणात राहते जे लोक वजन कमी करत आहेत त्यांच्यासाठी लेमन टी पिणे फायदेशीर ठरू शकते. जर तुमचे वजन वाढत असेल तर तुम्ही लेमन टीच्या सेवनाने ते नियंत्रणात ठेवू शकता. लिंबूमध्ये खूप कमी प्रमाणात कॅलरीज आढळतात. यामुळेच लेमन टीचा वापर वजन कमी करण्यात मदत करू शकतो.४. हायड्रेटेड करते तज्ज्ञांच्या मते, महिलांनी दिवसातून किमान २.५ लिटर आणि पुरुषांनी दिवसातून किमान ३.५ लिटर पाणी प्यावे. आपण अनेकदा योग्य प्रमाणात पाणी पित नाही ज्यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. यासाठी लेमन टी हा उत्तम पर्याय आहे. लेमन टीचे सेवन केल्याने तुम्हाला हायड्रेट ठेवण्यास मदत होते.



## म्हसवे शिवारात गॅस सिलिंडरचा स्फोट

जळगाव : म्हसवे शिवारात (ता. पारोळा) येथे तीन ते चार गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. यात सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नसली तर दोन चारचाकी (ओमनी) जळून खाक झाला. यात सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नसली तर दोन चारचाकी (ओमनी) जळून खाक झाला.पारोळा शहरापासून तीन किमी अंतरावर असलेल्या म्हसवे शिवारात शुक्रवारी (ता.१९) रात्री साडेनऊला दोन ओमनींमध्ये अवैधरीत्या गॅस भरणा-या स्टेशनवर गॅस भरण्यासाठी आल्या होत्या. गाडींमध्ये गॅस भरत असताना अचानक स्फोट झाला. यात दुकानात असलेले तीन ते चार सिलिंडर देखील फुटले तर गॅस भरण्यासाठी आलेल्या दोन्ही ओमनी जळून खाक झाल्या. हा स्फोट एवढा भीषण होता की त्याचा आवाज दूरवर पोचला. त्यामुळे गावातील लोक भयभीत झाले.गॅस सिंलिडरचा स्फोट झाल्याची माहिती मिळताच पारोळा येथील अग्निशामक दलाचा बंब घटनास्थळी दाखल झाला त्यातील मनोज पाटील व त्यांच्या सहका-यांनी तत्काळ घटनास्थळी ओमनीला लागलेली आग आटोक्यात आणली. आग विझल्यानंतर अग्निशमन दलाने याठिकाणी असलेल्या सुमारे २० ते २५ गॅस सिंलिडर ताब्यात घेतले. जळून खाक झालेल्या गाड्यांमध्ये अवैधरीत्या गॅस कोण भरत होते. ही वाहने कोणाची होती. हे मात्र समजले नाही.



## ईडीकडून हेमंत सोरेन यांची चौकशी

रांची : झारखंडमधील कथित जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणाच्या चौकशीसाठी अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) अधिकारी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सरकारी निवासस्थानी पोहोचून चौकशी केली. कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी रांची प्रशासनाने हिनू विमानतळावरील ईडी कार्यालयाची सुरक्षा वाढविली आहे. कार्यालयाबाहेर पोलिसांच्या बॅरिकेड्ससह सीआरपीएफचे जवान तैनात आहेत.मुख्यमंत्री निवास्थानाबाहेरही कडेकोट सुरक्षा बंदोबस्त ठेवण्यात आला असून रांचीतील वरिष्ठ पोलिस अधीक्षक चंदन कुमार सिन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली असून १००० हून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ईडी चौकशी पूर्ण होईपर्यंत मुख्यमंत्री निवास्थाबानाजवळ ट्रॅफिक डायव्हर्जन राहील, तसेच येण्या-जाण्यावरही बंदी असेल. तत्पूर्वी, मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर ईडीने राज्याच्या पोलीस प्रमुखांना एक प्रत्र लिहून कडेकोट सुरक्षा व्यवस्थेचा बंदोबस्त करण्यासंदर्भात विनंती केली होती. ईडीने गेल्या १३ जानेवारीला झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना आठव्यांदा समन्स जारी करून त्यांना १६ जानेवारी ते २० जानेवारी दरम्यान चौकशीसाठी उपलब्ध राहण्यास सांगितले होते. यापूर्वी ते ७ समन्स मिळूनही ईडी समोर हजर झाले नव्हते. यानंतर केंद्रीय तपास यंत्रणा २० जानेवारीला आपल्या निवासस्थानी निवेदन घेऊ शकते, असे ईडीच्या समन्सला उत्तर देताना मुख्यमंत्री सोरेन यांनी म्हटले होते.





## २२ जानेवारीची सुट्टी रद्द करा; मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल


मुंबई : रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळा एका दिवसावर येऊन ठेपलेला असून, अयोध्येसह संपूर्ण देशभर जय्यत तयारी सुरू आहे. अशातच २२ जानेवारीचा हा प्राणप्रतिष्ठा सोहळा संस्मरणीय करण्यासाठी अनेक ठिकाणी लाइव्ह स्क्रिनिंगही केले जाणार आहे. तर या दिवशी शासकीय कर्मचाऱ्यांसह बँकांना सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, आता या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली असून, जाहीर केलेली सुट्टी रद्द करण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. त्यावर उद्या म्हणजेच रविवारी तातडीची सुनावणी होणार आहे.


२२ जानेवारी रोजी होत असलेल्या राम मंदिर लोकार्पण आणि रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी महाराष्ट्र सरकारनेही सार्जनिक सुट्टी जाहीर केली. घेतलेला हा निर्णय रद्द करा या मागणीची याचिका शिवांगी अग्रवाल, सत्यजित साळवे, वेदांत अग्रवाल व खुशी बांगीया या विधि शाखेच्या विद्यार्थ्यांनी दाखल केली आहे. या याचिकेवर रविवारी तातडीची सुनावणी घेतली जाणार आहे.

दाखल करण्यात आलेल्या याचिकेत काय म्हटले?

मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत नमूद आहे की, अयोध्येतील राममंदिर हे हिंदूंचं श्रद्धास्थान आहे. तेथील कार्यक्रमाचा सरकारचा काहीही संबंध नाही. आगामी लोकसभा निवडणुका समोर ठेवूनच हा कार्यक्रम भव्य करण्यात आला आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपनं जाहीरनाम्यात अयोध्येत राममंदिर उभारण्याचं आश्वासन दिलं होतं. राजकीय पक्षाला विशिष्ट धर्मीयांसाठी असं आश्वासन देता येत नाही. धर्माच्या नावाखाली मतं मागणं बेकायदा आहे, असं मत वेळोवेळी सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं आहे. केंद्रातील भाजप सरकारनं व ज्या राज्यांमध्ये भाजपची सत्ता आहे, त्यांनी राममंदिरासाठी भलीमोठी देणगीही दिली. धार्मिक कार्यासाठी सरकारनं कोणत्या अधिकारात देणगी दिली हा प्रश्नही अनुत्तरित आहे. आपला देश धर्मनिरपेक्ष आहे. अल्पसंख्याकांचे हीत जपण्यासाठी धर्मनिरपेक्षता आवश्यक आहे. विशिष्ट धर्मियांना प्रोत्साहन देणं किंवा एखाद्या धर्मियांची अवहेलना करणं हे सरकारचे काम नाही असे मुद्दे याचिकेतून मांडण्यात आले आहेत. तेव्हा या याचिकेवर उद्या रविवारी मुंबई उच्च न्यायालय काय निर्णय देते हे पहावे लागणार आहे.





या न्यायमूर्तींचं खंडपीठ करणार सुनावणी

राज्य सरकारने जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्टी विरोधात विधि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी याचिका दाखल करत विरोध केला आहे. दाखल याचिकेत विरोधाची कारणेही स्पष्ट केली आहेत. दाखल याचिकेत नमूद केल्याप्रमाणे या अचानक जाहीर केलेल्या सरकारी सुट्टीमुळे शैक्षणिक नुकसान तर होतेच आहे, शिवाय बँकाही बंद असल्यानं त्याचा आर्थिक फटका बसणार आहे. त्यामुळे ही सुट्टी रद्द करावी, अशी मागणी याचिकेतून करण्यात आली आहे. या याचिकेवर सुनावणी घेण्यासाठी खास न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी व न्यायमूर्ती डॉ. निला गोखले यांच्या खंडपीठाची स्थापना करण्यात आली आहे.

## कमी बर्फवृष्टीचा मान्सूनवर उत्तम परिणाम होणार

नवी दिल्ली/ पुणे : गेल्या वर्षी संपूर्ण हंगामात ६ टक्के मान्सून कमी होता. तर जुलै आणि सप्टेंबरमध्ये १३ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. तर जूनमध्ये पावसात ९ टक्के आणि ऑगस्टमध्ये ३६ टक्के घट झाली आहे. याबाबतची माहिती भारतीय हवामान विभागाचे महासंचालक एम महापात्रा यांनी दिली. दरम्यान, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडसह बहुतेक पर्वतीय राज्यांमध्ये खूपच कमी हिमवर्षाव झाला आहे. याचा सफरचंद आणि काही पिकांना फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, मात्र शेतक-यांनी फार काळजी करण्याची गरज नाही. यालाही एक सकारात्मक बाजू असून, कमी बर्फवृष्टीचा थेट परिणाम मान्सूनवर होऊ शकतो, ज्यामुळे चांगला पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे मत महापात्रा यांनी व्यक्त केले.हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडसह बहुतेक पर्वतीय राज्यांमध्ये खूपच कमी हिमवर्षाव झाला आहे. सफरचंद सारख्या काही बागायती पिकांसाठी कमी बर्फवृष्टी ही चिंतेची बाब असल्याचे भारतीय हवामान विभागाचे म्हणणे आहे. मात्र शेतक-यांनी फार काळजी करण्याची गरज नाही. यालाही एक सकारात्मक बाजू आहे. कमी बर्फवृष्टीचा थेट परिणाम मान्सूनवर होऊ शकतो, ज्यामुळे चांगला पाऊस पडेल. अशा परिस्थितीत एल निनोचा प्रभाव कमी होईल आणि खरीप हंगामात चांगला पाऊस झाल्याने पिकांचे बंपर उत्पादन होईल अशी शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक एम महापात्रा यांनी सांगितले की, गेल्या डिसेंबरपासून आतापर्यंत कोणतेही वेस्टर्न डिस्टर्बन्स आलेले नाही. पश्चिम हिमालयीन भागाला याचा फटका बसला आहे. त्याच वेळी, दोन सक्रिय वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे, उत्तर-पश्चिम आणि मध्य भारताच्या काही भागात पाऊस झाला. त्यामुळे उत्तराखंड वगळता इतर डोंगराळ राज्यांमध्ये या महिन्यात जवळपास दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, यावेळी डोंगरात कमी बर्फवृष्टी झाली, तर पुढचा मान्सून चांगला जाईल, असेही महापात्रा म्हणाले. गेल्या वर्षी ६ टक्के कमी गेल्या वर्षी संपूर्ण हंगामात मान्सून ६ टक्के कमी होता. जुलै आणि सप्टेंबरमध्ये १३ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. तर जूनमध्ये पावसात ९ टक्के आणि ऑगस्टमध्ये ३६ टक्के घट झाली आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ऑगस्टमधील पाऊस जूनच्या पातळीप्रमाणे झाला असता तर मान्सून सामान्य होऊ शकला असता. कर्नाटक आणि महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशच्या अनेक भागात कमी पाऊस झाला आहे. एप्रिलमध्ये अंदाज जाहीर होणारआगामी मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत (जून आणि जुलै) सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडू शकतो.

हा कल ऑगस्टपर्यंत चालू राहील. हे अंदाज विश्वसनीय असू शकतात. भारतीय हवामान विभाग एप्रिलच्या मध्यापर्यंत या हंगामाचा पहिला अंदाज जाहीर करेल. या अंदाजानंतरच यावर्षी मान्सूनची स्थिती नेमकी काय राहील याबाबतची माहिती मिळेल.

# शिक्षण विभागाने बासनात गुंडाळलेले कॉपीमुक्त परीक्षा अभियान नांदेड पॅटर्न पुन्हा राबविण्याची मागणी:



किनवट / ता.प्र.शेख शौकत :- देशाला कोणत्याही क्षेत्रात विकासात्मक प्रगती करायची झाल्यास त्या देशाची शिक्षण व्यवस्था किती निकोप व प्रभावी दर्जेदार शिक्षणातून विद्यार्थी घडतात त्यावर देशाचे विकासात्मक भवितव्य अवलंबून असते. हेच ध्येय उराशी बाळगून एखाद्या अधिका-याने ठरवले तर तो संपूर्ण जिल्ह्याचा काय राज्याचा कायापालट घडवून आणू शकतो, याचा अनुभव नांदेड जिल्ह्याने घेतला आहे. तत्कालीन नांदेड चे जिल्हाधिकारी श्रीकर परदेशी साहेब यांनी २०१० मध्ये अत्यंत शिस्तीने सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून महाराष्ट्रात आदर्श वाटणारे कॉपीमुक्त परीक्षा अभियान यशस्वी राबविले त्यानंतर हे कॉपीमुक्त परीक्षा अभियान फक्त नांदेड जिल्ह्या पुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रात नांदेड जिल्हा कॉपीमुक्त परीक्षा पॅटर्न राबविण्यात आले. २०१० मध्ये चालू झालेले अभियान काही वर्षे चालले मात्र त्यानंतर शिक्षण विभागाच्या दुर्लक्षाने हे अभियान बासणात गुंडाळण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील वास्तव समोर येऊन जिल्हाभरात गुणवत्तावृद्धी अभियान राबवून विद्यार्थ्यांचा पाया पक्का केला तर त्याचा परिणाम पुढील वर्षीच्या निकालात दिसून नक्कीच येईल. किनवट तालुक्यातील सुज्ञ पालकाकडून सदर अभियान पुनश्च राबवून दर्जेदार शिक्षण घेतलेले विद्यार्थी घडण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी होत आहे. या शैक्षणिक वर्षातील म्हणजेच २०२३-२४ इयता १२ वी ची वार्षिक परीक्षा २१ फेब्रुवारी तर १० वी ची परीक्षा एक मार्चपासून सुरू होणार आहे. या अनुषंगाने विद्यार्थी अभ्यास करत असताना त्यांना काही विद्यार्थी अभ्यास न करता परीक्षांमध्ये नक्कल करून अधिकचे गुण घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास करण्याचा उत्साह कमी झालेला आहे. त्यात काही शिक्षक व पालक सुद्धा विद्यार्थ्यांना नकला कॉपी करण्यासाठी प्रोत्साहित करत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी बघावयास मिळते. काही संस्थाचालक सुद्धा नकला न केल्यामुळे आपल्या शाळेचा निकाल कमी लागला तर दुसऱ्या वर्षी विद्यार्थी प्रवेश घेणार नाहीत परिणामी आपली एखाद्या वर्गाची तुकडी कमी होऊन शिक्षक अतिरिक्त होतील या भीतीने परीक्षेमध्ये कॉपी करण्यास हातभार लावतात असे अनेक उदाहरणे दिसून आलेले आहेत. अनेक विद्यार्थी गुणवत्ता नसताना केवळ कॉपी करून अधिकचे गुण मिळवलेले निकाल आल्यानंतर त्यांचे पालक आमच्या मुलाने परीक्षेमध्ये उत्कृष्ट गुण घेऊन चांगली टक्केवारी घेतल्याचे फुशारकी मिरवत असल्याचे बघायला मिळते. किनवट तालुक्यासह नांदेड जिल्हा अनेक वर्षांपासून दहावी-बारावीच्या परीक्षांतील कॉपीमुळे बदनाम झालेला आहे. संस्थाचालकांना राजकीय वरदहस्त असल्याने सर्रास कॉप्या चालतात. शिक्षण विभागाने संस्थाचालकांचा दबाव झुगारून कॉपीमुक्ती अभियान राबविणे आवश्यक आहे.

होऊ घातलेल्या परीक्षेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी साहेबांनी सर्व जिल्हा परिषद मुख्याधिकारी, पोलीस अधीक्षक, शिक्षणाधिकारी या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समन्वयातून आतापासूनच व्यूव्ह रचना करून तयारी केली तरच हे शक्य आहे. या सर्वांच्या प्रामाणिक समन्वयातून कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले तरच पुनश्च एकदा नांदेड पॅटर्न महाराष्ट्रात आदर्श ठरेल यात शंका नाही.

# जिल्ह्यातील धार्मिक स्थळांच्या स्वच्छता मोहिमेला प्रतिसाद

लातूर : प्रतिनिधी राज्यातील सर्व धार्मिक स्थळे आणि त्याच्या आजबाजूच्या परिसराची स्वच्छता करण्यासाठी 'स्वच्छ तीर्थ' मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील धार्मिक स्थळांच्या परिसरात स्वच्छता करण्यासाठी आयोजित मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गेल्या तीन दिवसांत या मोहिमेंतर्गत शहरी भागात १०१ धार्मिक स्थळांची, तसेच ग्रामीण भागातही विविध धार्मिक स्थळांची स्वच्छता करण्यात आली.लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख १० धार्मिक स्थळांसह नागरी भागातील १०१ धार्मिक स्थळे व त्यांच्या परिसरात स्वच्छ तीर्थ मोहिमेंतर्गत स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. गेल्या तीन दिवसांत झालेल्या या उपक्रमात अधिकारी, स्वच्छता कर्मचारी यांच्यासाह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धार्मिक स्थळांकडे जाणारे रस्ते, परिसरातील बारव यांची या मोहिमेंतर्गत स्वच्छ्ता करूण्यात आली. या दरम्यान नागरी भागात सुमारे १० टन कचरा संकलित करण्यात आला, अशी माहिती नगरपालिका प्रशासनचे सहआयुक्त्त रामदास कोकरे यांनी दिली.ग्रामीण भागातही विविध ठिकाणी ग्रामपंचायत आणि लोकसहभागातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी धार्मिक स्थळांची स्वच्छता, तसेच परिसराची स्वच्छता करण्यात आली. नागरी व शहरी भागात राबविण्यात आलेल्या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले होते. त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुंबई आणि ठाणे महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या डीप क्लीन ड्राईव्हच्या धर्तीवर राज्यातही स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेसाठी लातूर जिल्ह्यातील नागरी भागातील १०० ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. याठिकाणी डीप क्लीन ड्राईव्हच्या माध्यमातून नियमितपणे स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. तसेच या ठिकाणांचे सौंदर्यीकरण करण्यात येणार आहे. यामाध्यमातून 'स्वच्छतेची १०० ठिकाणे' तयार केली जाणार आहेत.लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रासह जिल्ह्यातील सर्वच नागरी भागांमध्ये डीप क्लीन ड्राईव्ह अर्थात सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यासाठी निवडण्यात आलेल्या ठिकाणी नियमितपणे टप्प्या-टप्प्याने संपूर्ण स्वच्छता केली जाईल. या मोहिमेमध्ये नागरिक, स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग आवश्यक आहे. तरी आपल्या शहरात, परिसरात डीप क्लीन ड्राईव्ह अंतर्गत आयोजित स्वच्छता उपक्रमात सर्वांनी सहभागी होवून ही मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.



# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील दृष्टी बाधित विद्यार्थी राहुल गोदाम यांचा सत्कार संपन्न



लातूर :- महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील दृष्टी बाधित विद्यार्थी राहुल गोदाम विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली द्वारा घेण्यात आलेल्या नेट परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल त्याचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल, स्मृतिचिन्ह आणि पुष्पहार देऊन त्याचा आणि आई विमलबाई भानुदास गोदाम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. श्रीराम भालेराव, प्रा. श्रीनंद पाटील, प्रा. शंकर भोसले, प्रा. मेघ:श्याम बोळेगावे, डॉ. आशा भैरट, रंगनाथ लांडगे आदीची उपस्थिती होती. राहुल भानुदास गोदाम याने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पदवी शिक्षण पूर्ण केले आणि त्यानंतर राज्यशास्त्र विषयांमध्ये पद्युत्तर शिक्षण पूर्ण करून त्याने यापूर्वी सेट परीक्षा सुद्धा उत्तीर्ण केली. त्याने विविध राष्ट्रीय, राज्य, विभाग आणि जिल्हा पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन पारितोषिके सुद्धा मिळविली आहेत. तसेच तो एक उत्कृष्ट वक्ता म्हणून सर्वांच्या परिचयाचा आहे. त्याच्या या उज्वल यशाबद्दल श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालय प्रमुख, समन्वयक, विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रीराम भालेराव यांनी केले तर आभार राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी यांनी मानले.

# शेकडो वाहनांनी हजारो नागरिक आंतरवलीला रवाना

लातूर : प्रतिनिधी मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई येथील उपोषणास पाठींबा देण्यासाठी शहर व जिल्ह्यातून शेकडो वाहनांनी हजारो मराठा समाजबांधव शुक्रवार दि. १९ जानेवारी रोजी रात्री आंतरवाली सराटीला रवाना झाले. उर्वरीत बांधव २३ व २५ जानेवारी रोजी मोठ्या संख्येत ट्रॅक्टर ट्रक टॅम्पो खासगी व सार्वजनिक वाहनांनी मुंबईस जाणार आहेत. आरक्षण मिळाल्या शिवाय मुंबई सोडणार नाही असा आम्ही निर्धार केल्याचे त्यांनी सांगितले. शुक्रवारी येथील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन करुन ते आंतरवाली सराटीस रवाना झाले. शनिवार दि. २० जानेवारी रोजी पहाटे ते आंतरवाली सराटीला पोहचले. रवाना झालेल्या नागरीकांनी त्यांना महिनाभर पुरेल एवढा शिधा सोबत घेतला आहे. आचारीही सोबत आहेत. आता आरक्षण मिळाल्यानंतरच आम्ही परत येवू असा निर्धार आम्ही केला असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान २३ जानेवारी रोजी जिल्ह्यातील गाव शहरातून मोठ्या संख्येत ट्रॅक्टर ट्रक, टॅम्पोने समाज बांधव मुबंईस रवाना होणार आहेत. त्यांनी त्यांना सोयीची ठरेल अशी रचना या वाहनांची केली आहे.शिधा, गॅस, स्वयपाकांची भांडी, पाण्यासाठी मोठ्या टाक्या, पत्रवाळ्या सोबत घेतल्या आहेत.

# किरकोळ बाजारपेठेत भाजीपाल्याचे दर घसरले

लातूर : प्रतिनिधी शहरातील महात्मा फुले भाजी मंडईत गत दोन अठवड्यापासून भाजीपाल्याची आवक वाढत असल्याने किरकोळ बाजारात भाजीपाल्याच्या दरात घसरण होत आहे. भाव कमी असल्याने सर्वसामान्य जनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेषत: पालेभाज्यांच्या भावात चांगलीच घसरण झाल्याचे दिसून येत आहे.एरवी कोथंबीरची ३० रुपयांना असलेली जुडी १५ ते २० रुपयांत येत आहेत. त्यासोबतच वांगे, मिरची तसेच बटाटे, शिमला मिरची यांचे भाव २० ते ३० रुपये प्रतिकिलो दरम्यान आहेत. टोमॅटोच्या भावात चांगलीच चढ-उतार होत आहे. १० ते २० रुपये किलो टोमॅटो मिळत आहेत. तर कारला, दोडके, सिमला मिरची आदींची भावे ३० ते ४० रुपये प्रतिकिलोच्या दरात आहे. फुल कोबी, पत्ता कोबी, गाजर, पालक, मेथी आदींचे भावही आटोक्यात आले असल्याचे व्यापारी मिनाझ बागवान यांनी एकमतशी बोलताना सागीतले आहे.नोव्हेंबरमध्ये पडलेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिके खराब झाली होती. इतर फळभाज्यांप्रमाणे पालेभाज्यांनाही या पावसाचा मोठा फटका बसला. भाजीपाला लवकर नासत असल्यामुळे शहरातील बाजार समितीत येण्या आधीच काही माल खराब होत होता. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून मेथी आणि कोथबीरसह आदी पालेभाज्यांचे भाव वधारले होते.

शहरातील कृषी उत्पन्न बाजारात मालाची आवक कमी होत असल्याने भाजीपाल्याला चागला दर मिळाला होता. कोथबीर, मेथी, काकडी, मिरची, दोडका आदी पालेभाज्या ४० ते ५० रुपये प्रति किलो दराने विकली जात होती. सध्या थंडीची लाट पसरल्यामुळे भाजीपाला पिकांना पोषक वातावरण तयार झाल्याने, त्यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे बाजार समितीत भाजीपाल्याची आवक वाढल्याचे पाहायला मिळत आहे.शहरातील महात्मा फुले बाजार समितीत ग्रामिन भागासह धाराशिव, उमरगा आदी भगातून भाजीपाला दाखल होत असतो. शहरातील बाजार समितीत गेल्या आठवड्यापासून आवक वाढल्यामुळे किरकोळ बाजारात पालेभाज्यांच्या दरात घसरन झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

# भारताशी मैत्रीभावना वाढविण्यासाठी तिबेटी संसदची सद्भावना यात्रा




मुंबई /विशेष प्रतिनिधि : - १७ व्या लोकसभेचे तिबेटी संसद सदस्य धर्मशाळा हिमाचल प्रदेश यांनी मुंबई पत्रकार संघात पत्रकर परीषद घेऊन तिबेटी लोकांवर चीन सरकर कशा पद्धतीने अन्याय अत्याचार करते यांची माहिती देण्यासाठी आणि भारताशी मैत्रीभावना वाढविण्यासाठी तिबेटी संसदची सद्भावना यात्रा दिनांक १६ ते २० जानेवारी २०२४ मुंबई येथे आलेली आहे. त्यात मिसेस सिरींग यंगचेन,मिस्टर जिग्मे सुल्टीमद, गेशे अतुक सेटन,(लामा- पूज्य भन्ते यांना गेशे ही पदवी दिलेली असते.) यांनी त्यांची तिबेटी मातृभाषेत सांगितले त्याचा हिन्दी अनुवाद मिस्टर जिग्मे सुल्टीम यांनी उत्तम प्रकारे केला.

तिबेटी भारतीय निर्वाशी संसद यांनी चीन सरकार तिबेटी नगरिकावर कशा पद्धतीने अन्याय अत्याचार करते आणि तेथील सामाजिक,सांस्कृतिक,भूगोलीक आणि राजकीय परिस्थिती किती भवायव आहे हे सांगण्यासाठी आज आपल्या समोर आलो आहे.तिबेट एक काली स्वातंत्र राष्ट्र होते. ते चीन ने नष्ट करण्याचे काम केले आहे. त्याला स्वातंत्र मिळविण्यासाठी जो जनसंघर्ष सुरू आहे त्याला भारताने नेहमीच सहकार्य सर्वपरीने मदत केली आहे. तिबेट मध्ये दलाई लामा यांचा फोटो ठेवल्यास पोलीस पकडून जेल मध्ये टाकतात. बौद्ध भिख्खूना बौद्ध नागरिकांना नजर कैदेत ठेवले जाते त्यांच्या घरच्या चारीबाजुला सीसी टी व्ही कॉमेरे लावले जातात. त्यामुळे आज पर्यंत १५८ लोकानी आत्मदहन करून घेतले आहे. त्यांची आमच्याकडे अधिकृतपणे नोंद आहे.बाकी घटना लपविल्या जातात त्यांची कुठेही नोंद घेतल्या जात नाही. याबाबत संयुक्त राष्ट्राकडे आम्ही नियमित पणे विनंती अर्ज,तक्रारी करीत असतो. भारत अमेरिका सारखे देश याबाबत मीटिंग मध्ये मानव अधिकार म्हणून प्रश्न उपस्थित करतात. पण त्यांची चीनच्या दबावामुळे फारशी दाखल घेतली जात नाही.

जगात १४० बुद्धिस्ट राष्ट्र आहेत पण त्यांचे चीनशी आर्थिक व बाजार पेठ व्यावहारिक संबंध असल्यामुळे राजकीय हित संबंध अडचणीचे असल्या कारणाने ते रोखठोक भूमिका घेऊ शकत नाही. याची आम्हाला कल्पना आहे.चीन हा साम्यवादी सामंतवादी कम्युनिष्टवादी शासन मानव अधिकाराचे हनण करण्याचे काम करीत आहे.प्राकृतिक संसाधन,नैसर्गिक साधन संपती नष्ट करण्याचे काम करीत आहे. त्यावर सर्व राष्ट्राने राजनैतिक दडपण आणून दलाई लामाजी बरोबर चर्चा घडवून आणावी अशी आम्ही सर्व राष्ट्राच्या नागरिक,समाज सेवी संस्था (एन. जी.ओ) आणि प्रेसच्या माध्यमाट्ुन्न जन मानस पर्यंत पोचविण्यासाठी मैत्री भावना वाढविण्यासाठी आणि सदभावना जागरूक करण्यासाठी हे कॉम्पियन राबवित आहोत.तिबेटचे दहावे लामा चे अवतारी पुरुष अकरावे लामा यांना जन्मापासून चीन सरकारने बंधीस्थ करून ठेवले आहे ते कुठे आहेत याची माहिती दिल्या जात नाही.१९५० पासून दलाई लामा हे चौदावे लामा आहेत.बहुसंख्य लोकांना याची माहिती नसल्यामुळे तिबेटी लोक बदल गैरसमज निर्माण होतात ते दूर करण्यासाठी मुंबई दौरा सुरू आहे. यात त्यांनी माननीय दिलीप वळसे पाटील-सहकार मंत्री,माननीय सुभाष बनसोडे-क्रीडा व युवक कल्याण,बंदरे मंत्री,अजित दादा पवार उपमुख्यमंत्री,अर्थ,व नियोजन.माननीय राहुल नार्वेकर विधानसभा अध्यक्ष यांची सदिच्छा भेट घेतली.तिबेटी संसद सदस्य यांना मुंबई मध्ये भेटी घेण्यासाठी वाहतुकीच्या अडचणीवर मात करून फिरविण्यासाठी संदेश मेश्राम क्षेत्रीय संयोजक कोर ग्रुप फॉर तिबेटियन कॉज,बाळासाहेब रास्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

# लातूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रीय संत संदेश पक्षाचा पहिला उमेदवार जाहीर

अॅड.श्रीधरकसबेकरांच्याउमेदवारीचीकेलीघोषणा

लातूर - लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील ५० नोंदणीकृत राजकीय पक्षांनी एकत्र येवून भारतीय जनविकास आघाडी निर्माण केली असून या तिसर्या आघाडीअंतर्गत राष्ट्रीय संत संदेश पक्षाने आपल्या पहिल्या उमेदवाराची घोषणा आज २० जानेवारी रोजी केली असून पुणे येथील अॅड. श्रीधर एल. कसबेकर हे अधिकृत उमेदवार लातूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याचे राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र बनारसे यांनी आज लातूर येथे अंबिका हॉटेल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले आहे. यावेळी उमेदवार अॅड. श्रीधर कसबेकर, पक्षाचे महासचिव अॅड. शिवकुमार स्वामी औंधकर, लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग शिंदे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष हभप रामेश्वर महाराज आदींची प्रमुख उपस्थिती होती. अॅड. श्रीधर कसबेकर हे उमेदवार प्रख्यात वकिल आणि क्रांतीवीर लहूजी साळवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष असून ते भाजपचे पुणे शहर उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलेले आहे. ते मूळचे बार्शी तालुक्यातील कोरफळचे रहिवाशी असून त्यांचा लातूरशी घनिष्ठ संबंध आहे. तसेच सर्व धर्म, पंथातील समाज समूह तसेच दुर्बल, उपेक्षित, वंचित, सर्वहारा मराठी भाषिक आरक्षण समर्थकांचा समरसतावादी कार्यकर्ता प्रतिनिधी म्हणून लातूर लोकसभा निवडणूक लढवणार आहेत. तसेच राष्ट्रीय संत संदेश पक्ष राज्यातील लातूरसह सांगली आणि नाशिक या तीन लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढवणार आहे. या पक्षाचे निवडणुक चिन्ह नगारा असून स्तुती छोडो धनवान की कदर करो इन्सान की, असे ब्रीद असल्याचे राजेंद्र बनारसे यांनी यावेळी सांगितले. सामाजिक क्रांतीची या देशाला अजूनही गरज आहे. त्यासाठीची आमची धडपड आहे. त्यामुळे विकासाचा अजेंडा घेवून भारतीय जनविकास आघाडी निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. राष्ट्रीय संत संदेश पक्ष सध्या प्रचारात आघाडीवर आहे. लातूर लोकसभा मतदारसंघातील सुमारे ९०० गावात पक्षाचे सदस्य, कार्यकर्ते काम करत असल्याची माहिती खुद्द या पक्षाचे उमेदवार अॅड. श्रीधर कसबेकर यांनी दिली आहे.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE